**<u>नियमित दिवाणी दावा क्र. २७/२०२१ मधील</u>**
**<u>निशाणी ४६ वरील आदेश</u>**
**<u>(सुशिलाबाई लोहार वि. युवराज लोहार)</u>**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जात असे कथन केले की, मुळ दावा प्रलंबित असताना दिनांक ०५.०२.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे कुलमुख्त्यारधारक रघुनाथ मेटकरी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेकडून दावा मिळकत कलम १-ब मधील गट नं.२१३ ही मिळकत दस्त क्र.५२९ ने खरेदी केली तसेच दिनांक २२.०४.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१६ ने प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे कुलमुख्त्यार धारक रघुनाथ मेटकरी यांचेकडून कुलमुख्त्यारपत्र करुन घेवून तिच मिळकत दिनांक २२.०४.२०२४ रोजी दस्त क्र.१५८९ ने खरेदी घेतली आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ व २ यांचे कुलमुख्त्यारधारक मोहन साळुंखे यांनी प्रतिवादी क्र.१ व २ यांचेकडून दिनांक १८.०३.२०२४ रोजी दस्त क्र.११४१ ने खरेदी केली आहे. सदरचे खरेदीपत्र वादीवर बंधनकारक नाहीत. त्याबाबतचा मजकूर दावा कलम ५-अ(१), ६-अ व ७-अ मध्ये दुरुस्त करणेची परवानगी मिळावी तसेच प्रतिवादी क्र.१६ नंतर प्रतिवादी क्र.१७ येथे रघुनाथ बबन मेटकरी, प्रतिवादी क्र.१८ येथे मधुकर मोहन साळुंखे व प्रतिवादी क्र.१९ येथे विटा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी यांची नावे नमुद करणेस परवानगी मागितली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादीने म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, प्रतिवादींविरुध्द कोणताही मानाईचा आदेश नसलेने लिस पेन्डसीची बाधा येत नाही. तसेच वादी मागत असलेली दुरुस्तीस परवानगी दिली तर दाव्योच स्वरुप बदलणार आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी मागत असलेली दुरुस्ती करुन मिळण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

मुद्दा क्र.१ व २ करीता -

५. वादी व प्रतिवादी तर्फे युक्तीवाद ऐकला.

६. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश ६ नियम १७ अन्वये कोणतीही दुरुस्ती मंजुर करायची असेल तर न्यायालयाने जी बाब लक्षात घेणे महत्वाचे आहे ती बाब म्हणजे प्रस्तावित दुरुस्ती ही दोन्ही पक्षांमधील खरा वाद आहे त्या वादाच्या निकालासाठी आवश्यक आहे काय हे पाहणे आवश्यक ठरते. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश ६ नियम १७ अन्वये न्यायचौकशी सुरु झाल्यानंतर पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेवून सुध्दा न्यायचौकशी होण्यापुर्वी दुरुस्ती मागत असलेली बाब न्यायालयापुढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झालेखेरील दुरुस्तीची परवानगी देता येणार नाही.

७. प्रस्तुत दाव्यात न्यायचौकशी सुरु झाली आहे. प्रस्तुत दाव्यात वादीचा पुरावा पुर्ण झालेला नाही. त्यामुळे वादी मागत असलेली दुरुस्ती केलेस त्याबाबत प्रतिवादीस पुरावा देण्याची तसेच वादीचा उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध असणार आहे. तसेच दावा वाटपाबाबत असून भविष्यात दावा मिळकतींबाबत निर्माण होणारा वाद हा या एकाच दाव्यात निर्णीत करता येणे शक्य आहे. वादी मागत असलेली दुरुस्ती म्हणजे दिनांक ०५.०२.२०२४, २२.०४.२०२४ व दिनांक १८.०३.२०२४ रोजीच्या दस्ताबाबत असलेने त्याबाबत प्रतिवादीस पुरावा देण्याची संधी प्राप्त होणार आहे तसेच त्या मुद्यांवर कैफियत दाखल करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच सदर खरेदीचा व्यवहार दावा दाखल झाल्यानंतर झालेला आहे. त्यामुळे वादी मागत असलेली दुरुस्ती दोन्ही पक्षकारांमधील खरा वाद निर्णीत करणेच्या दृष्टीने योग्य आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादीने पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2024.08.08 11:16:18 +0530

दिनांक : ०५.०८.२०२४

**(अ.ब.सोनटक्के)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव